# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- registrar@unigug.ac.in  दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४  email:-establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./२९९०/२०२४ — दि. २१/०९/२०२४

## अधिसूचना

संदर्भ :- मा.राजभवन सचिवालय, मलबार हिल, मुंबई यांचे पत्र क्र. RB/GUG-२०२४/CR-९४३/Edn.१/ १०२५, दि. २०/०९/२०२४.

गोंडवाना विद्यापीठाचा अकरावा व बारावा दीक्षांत समारंभ बुधवार, **दि. २ ऑक्टोंबर, २०२४** रोजी सकाळी ११.०० वाजता, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे संपन्न होणार आहे. या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान मा. श्री. सी. पी. राधाकृष्णन, महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा मा. कुलपती, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली हे भुषवणार आहेत. तसेच या समारंभात गोंडवाना विद्यापीठाचे मा. कुलगुरु, डॉ. प्रशान्त बोकारे व मा. प्र-कुलगुरु, डॉ. श्रीराम कावळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सदर समारंभामध्ये मा. अध्यक्ष, अतिथी, अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद यांचे सन्माननिय सदस्य आणि विद्यापीठातील विविध प्राधिकरणाचे/मंडळाचे/समित्यांचे सदस्य यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या समारंभात विशेष गुणवत्ता प्राप्त, प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी व विद्यार्थीनींना सुवर्ण पदक, आचार्य पदवी व पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, विद्यार्थी तसेच विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी **बुधवार दि. २ ऑक्टोंबर, २०२४ रोजी सकाळी १०.००** वाजता दीक्षांत समारंभास उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

**मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने**

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग मुंबई.
३. मा. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग पुणे.
४. मा. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.
५. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली.
६. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
७. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
८. सर्व प्राधिकरणांचे सन्माननीय सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
९. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर अधिसूचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.
१०. मा. सर्व शैक्षणिक तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख/युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसूचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.
११. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सूचित करण्यात येते की, सदर अधिसूचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
१२.आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

२०/९/२४
**(श्री. देवेंद्र झाडे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली